Movie: Garambicha Bapu
Year: 1980

Song: Chandan Tipur Halato Vara
Lyricist: Shanta Shelke

चांदनं टिपूर
चांदनं टिपूर हलतो वारा
की डुलतो वारा
टाकते पलंग
टाकते पलंग पुढल्या दारा
की मागल्या दारा
त्यावर बसा की हवालदारा
की शिलेदारा
चांदनं टिपूर  चांदनं टिपूर
हलतो वारा की डुलतो वारा

डावी पापणी फुरफुर करी
नवसाला अंबाबाई पावली खरी
हो डावी पापणी फुरफुर करी
नवसाला अंबाबाई पावली खरी
अवचित सजना आला घरी
मनीच्या खुशीची
मजला कुशीत घालीन वारा
चांदनं टिपूर  चांदनं टिपूर
हलतो वारा की डुलतो वारा
चांदनं टिपूर
हलतो वारा की डुलतो वारा

हुर्र...हे हे ....
आ हा...
पंच कल्याणी घोडयावरून
दौडत आलो सये दुरून
बघना
पंच कल्याणी घोडयावरून
दौडत आलो सये दुरून
रूप घेऊ दे डोळा भरून
रूप घेऊ दे डोळा भरून
तुजला बघून गं जाईल निघून हा
थकवा सारा
हे हे हे चांदनं टिपूर
हलतो वारा की डुलतो वारा
चांदनं टिपूर
हलतो वारा की डुलतो वारा

शालूच्या पदरानं पुसते हं पाय
खायाला देते मी साखर साय
हो शालूच्या पदरानं पुसते हं पाय
खायाला देते मी साखर साय
आणखीन सेवा करू मी काय
पडते गळा की लावते लळा
की द्या आधारा
चांदनं टिपूर
हलतो वारा की डुलतो वारा
चांदनं टिपूर
हलतो वारा की डुलतो वारा

नेसून चांदनं आलीस अशी
पुनव चांदनी झुकली जशी
आ हा हा...
नेसून चांदनं आलीस अशी
पुनव चांदणी झुकली जशी
डाव्या हाताची घे गं उशी
डाव्या हाताची घे गं उशी

PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.

PlanetRead

Literacy for a Billion

चांदनं  मिठीत की
चांदनं  दिठीत की
रिमझिम धारा
चांदनं टिपूर हे  चांदनं टिपूर
हलतो वारा की डुलतो वारा
टाकते पलंग टाकते पलंग

पुढल्या दारा की मागल्या दारा
त्यावर बसा की हवालदारा
की शिलेदारा
चांदनं टिपूर  चांदनं टिपूर
हलतो वारा की डुलतो वारा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*